दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | रविवार 22 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 274 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com






# मुंबईत पर्यावरण विभागाचा 'माझी वसुंधरा' राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा थाटात

## पर्यावरणाची व्यापक मोहीम राबविल्याबद्दल राज्यपालांनी केले पंकजाताईंचे कौतुक

**पर्यावरणविषयक मोहिमेची कृषि क्षेत्राशी सांगड घालावी**

**राज्यपाल आचार्य देवव्रत यांचे आवाहन : माझी वसुंधरा हे ईश्वरीय कार्य**

**माझी वसुंधरा' अभियान लोकचळवळ व्हावी - सुनेत्रा पवार**

**शाश्वत विकासातुन सक्षम महाराष्ट्र घडवू - ना. पंकजाताई मुंडे**

मुंबई | प्रतिनिधी

**पर्यावरण रक्षणासाठी माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून सुरु असलेले कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. माझी वसुंधरा अभियानाला आता लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त आहे. भावी पिढीच्या निरोगी आयुष्यासाठी जनसामान्यांच्या मदतीने हाती घेतलेले हे ईश्वरीय कार्य आहे, असे उद्गार राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी काढले. रासायनिक शेती, पर्यावरणीय बदल आरोग्यासाठी घातक असून या अभियानाची कृषि क्षेत्राशी सांगड घालण्याची गरज अधोरेखित करून नैसर्गिक शेतीचा पुरस्कार करण्याचे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी यावेळी केले.**

वरळी एनएससीआय डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम येथे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वतीने आयोजित माझी वसुंधरा राज्यस्तरीय सन्मान सोहळा राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग मंत्री पंकजाताई मुंडे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी माझी वसुंधरा मिशन 4.0 आणि 5.0 अंतर्गत राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

पर्यावरणासाठी शासन स्तरावर पहिल्यांदाच एवढ्या व्यापक प्रमाणात आणि प्रभावी पद्धतीने मोहिम राबविल्याबद्दल पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांचे राज्यपाल श्री. देवव्रत यांनी अभिनंदन केले. ते पुढे म्हणाले की, पर्यावरण रक्षण हे संपूर्ण जगासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. ग्लोबल वार्मिंगमुळे तापमान वाढू लागले आहे. नैसर्गिक संकटं ओढावण्याची भिती जागतिक पातळीवर व्यक्त केली जात आहेत. निसर्गाचे, पर्यावरणाचे रक्षण करणे हे जीवसृष्टीसाठी महत्वाचे आहे. या अभियानाच्या माध्यमातून सुरु असलेले कार्य हे ईश्वरीय सेवा आहे असेही राज्यपाल यांनी सांगितले.

पर्यावरण रक्षणासाठी राज्यपालांनी यावेळी पंचसूत्री मांडली. पर्यावरणाचे संवर्धन विकास धोरणाच्या केंद्रस्थानी ठेवून, प्रत्येक विकास प्रकल्पात "ग्रीन ऑडिट" अनिवार्य करावे. स्थानिक पातळीवर हरित अर्थव्यवस्थेला चालना देऊन, स्थानिक स्वराज्य संस्थांनी "ग्रीन बजेट" तयार करावे आणि कचरा व्यवस्थापन, सौर ऊर्जा, पावसाच्या पाण्याचे संकलन तसेच नैसर्गिक शेतीला आर्थिक प्रोत्साहन द्यावे. पर्यावरण शिक्षणास प्रोत्साहन देवून, माझी वसुंधरा अभियानाच्या माध्यमातून जनसहभागाला चळवळीचे स्वरूप द्यावे आणि प्रत्येक नागरिक "क्लायमेट वॉरियर" बनावावा. डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे वृक्षारोपण, जलसंधारण आणि प्रदूषण नियंत्रणाची रिअल-टाइम पाहणी व्यवस्था निर्माण करावी, जेणेकरून पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित होईल. "माझी वसुंधरा" अभियान हे सर्वांनी ध्येय म्हणून स्वीकारल्यास नक्कीच अपेक्षित बदल घडेल, असा विश्वासही राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला.

महाराष्ट्र कृषी प्रधान राज्य आहे. शेतीची निर्भरता निसर्गावर अवलंबून आहे. जमीन,पाणी, हवा या नैसर्गिक घटकांवर शेती अवलंबून असते. त्यामुळे वातावरण बदलामुळे सर्वात जास्त नुकसान शेतीच होतं. याची नोंद आपण सर्वांनी घेतली पाहिजे. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल राखत, वैज्ञानिक नियोजन आणि लोकसहभागातून वातावरण अनुकूल महाराष्ट्र घडवावा आणि भावी पिढ्यांसाठी सुरक्षित, हरित आणि सक्षम महाराष्ट्र घडविण्याचा संकल्प करण्याचे आवाहन करुन माझी वसुंधरा अभियानमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सर्व पुरस्कारप्राप्त स्थानिक स्वराज्य संस्थांचं उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी अभिनंदन केले. या प्रसंगी माझी वसुंधरा अभियानावर आधारित माहितीपट सादर करण्यात आला. तसेच अभियानातील यशोगाथांवर आधारित "कॉफी टेबल बुक" आणि "द क्लायमेट चेंज लेक्सिकॉन" (मराठी-इंग्रजी पर्यावरण शब्दकोश) यांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



### माझी वसुंधरा' अभियान लोकचळवळ व्हावी- उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**पृथ्वी, वायू, जल, अग्नि आणि आकाश या पंचतत्त्वांचं जतन करणं आपली संस्कृती आणि कर्तव्य आहे. हवामान बदलाचं संकट आपल्यासमोर उभं असताना 'माझी वसुंधरा' अभियानाच्या माध्यमातून केलेली वृक्षारोपण, घनकचरा व्यवस्थापन आणि जलसंधारणाची कामे कौतुकास्पद आहेत. 'माझी वसुंधरा' हे अभियान नाही तर लोकचळवळ झाली पाहिजे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केलं. उपमुख्यमंत्री पवार म्हणाल्या, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाचा विचार करत असताना आपल्याला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित दादांची आठवण आल्याशिवाय राहत नाही. निसर्गाच्या बाबतीत त्यांच्या मनात असलेलं हळवेपण आपण सर्वांनी अनेकदा बघितलं आहे. अनेक क्षेत्रात महाराष्ट्रानं देशाला दिशा दिली आहे. विकास केवळ आर्थिक वाढीपुरता मर्यादित न ठेवता, शाश्वत, पर्यावरणपूरक आणि भावी पिढ्यांचा विचार करणारा असावा, हे दिवंगत अजित दादांचं स्वप्न होतं.**




### शाश्वत विकासातुन सक्षम महाराष्ट्र घडवू - पंकजाताई मुंडे

**महाराष्ट्राचा विकास पर्यावरणपूरक आणि दीर्घकालीन दृष्टीकोनावर आधारित असला पाहिजे. यासाठी नियोजनबद्ध कृती, संस्थात्मक बळकटी आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातून आपण शाश्वत विकासातून सक्षम महाराष्ट्र घडविण्यास कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केले. आज "माझी वसुंधरा" अभियानामुळे पर्यावरण संरक्षण हा विषय प्रत्यक्ष कृतीत उतरला आहे. शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नागरिक यांच्या समन्वित प्रयत्नांमुळे राज्यात शाश्वततेची मजबूत पायाभरणी होत आहे. राज्य शासनाने पर्यावरणीय प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी माझी वसुंधरा अभियान या राज्यव्यापी उपक्रमाची अंमलबजावणी सुरू आहे. जैविक शेती ही अभियान पुढच्या टप्प्यात राबविण्यात येणार असून नैसर्गिक शेतीचा अवलंब करून सुपीक जमीन, शुद्ध पाणी आणि शुद्ध हवेसाठी पर्यावरणरक्षणाचा संकल्प करण्याचे आवाहन मुंडे यांनी केले.**

**विविध पुरस्कार प्रदान**

याप्रसंगी राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचे पुरस्कार - ग्रामपंचायत (एकूण 18 स्थानिक संस्था), राज्यस्तरीय द्वितीय, तृतीय, उंच उडी आणि उत्तेजनार्थ पुरस्कार (एकूण ४५), राज्यस्तरीय द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार (एकूण 34 स्थानिक स्वराज्य संस्था) नगर परिषद व नगर पंचायत गट यांना पुरस्कारांनी संस्थां आणि अधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या वतीने पवित्र रमजान निमित्त 5 हजार वेळापत्रक कार्डांचे वितरण



परळी वैजनाथ | प्रतिनिधी

पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील मुस्लिम बांधवांना उपवास व नमाज वेळांची अचूक माहिती उपलब्ध व्हावी या उद्देशाने नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या वतीने शहरात ५ हजार रमजान वेळापत्रक कार्डांचे वितरण करण्यात येत आहे. या उपक्रमाचा शुभारंभ बरकतनगर परिसरातून मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रसंगी माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव भैय्या धर्माधिकारी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष अय्युब पठाण, माजी उपनगराध्यक्ष शकील कुरेशी, नगरसेवक अझीझ कच्छी आदींच्या हस्ते वितरणाला सुरुवात करण्यात आली. रमजान काळात रोजा, सेहरी व इफ्तार तसेच पाच वेळच्या नमाजांच्या वेळांची अचूक माहिती नागरिकांना मिळावी यासाठी हे वेळापत्रक कार्ड उपयुक्त ठरणार आहे.यावेळी स्थानिक कार्यकर्ते, नागरिक व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपक्रमाबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त करत नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांचे आभार मानले.

# स्व. महादेव मुंडे यांच्या मुलांना परळीत मारहाण अज्ञातांविरोधात तक्रार नोंद

## "बाल्या बाल्या" नेमका कोण? आणि कोणाचा साथीदार

परळी वैजनाथ : प्रतिनिधी



परळी शहरात स्वर्गीय महादेव मुंडे यांच्या मुलांना अज्ञात मुलाने मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात एनसीआर (NC) तक्रार नोंद करण्यात आली आहे. ही घटना दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारच्या सुमारास घडल्याची नोंद अहवालात करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महादेव मुंडे यांची मुले परळी येथे परीक्षेवरून परत येत असताना काही अज्ञात मुलाने त्यांना शिवीगाळ करत मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेनंतर त्यांच्या आईने परळी शहर पोलीस ठाण्यात धाव घेत अधिकृत तक्रार दाखल केली आहे. फिर्यादीत नमूद करण्यात आलेली विशेष बाब म्हणजे, मारहाण करणाऱ्या मुख्य मुलाला त्याचे साथीदार "बाल्या... बाल्या..." अशा नावाने हाक मारत असल्याचा उल्लेख आहे. एनसीआर क्रमांक 0035/2026 अंतर्गत भारतीय न्याय संहिता (BNS) मधील संबंधित कलमांनुसार प्रकरणाची नोंद करण्यात आली असून अज्ञात आरोपींविरुद्ध कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पुढील तपास परळी शहर पोलिस करत आहेत.




**रिपब्लिकन सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष विजयदादा साळवे परळी येथे दिनांक 20 फेब्रुवारी रोजी आले असताना त्यांचा सत्कार करताना ज्येष्ठ नेते सुरेश रोडे, पत्रकार भगवान साकसमुद्रे, बनसोडे निकेश, विनोद घुमरे, योगेश जगताप ,गौतम रोडे आदी छायाचित्रात दिसत आहेत**

## संपादकीय

# आडवा टँकर

१७ टन ज्वालाग्रही वायू कोचीहून गुजरातला घेऊन जाणाऱ्या या टँकरला मार्गात आणखी शंभर प्रकारच्या अडचणी येऊ शकल्या असत्या. सामान्यांच्या जीवाला त्यातून असंख्य धोके उद्भवू शकले असते. अशा टँकरला रस्त्यावरून प्रवास करताना खबरदारी घेण्याची काही अट आहे की नाही?


आधी 'इंडिगो' आणि आता मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अपघाती कोंडीने पायाभूत सुविधा खासगी संस्थांच्या हाती किती प्रमाणात द्याव्यात, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. खासगीकरणानंतरच्या या सेवांच्या कार्यक्षमतेचं गुलाबी चित्र रंगवताना बहुतांश वेळा पाश्चिमात्य देशातील खासगी सेवांचा दाखला दिला जातो. तो पूर्णांशाने नसला, तरी काही प्रमाणात खरा असतो. त्याला कारण आहे, तिथले नागरिक आणि ग्राहक हक्क, विमा कंपन्यांचा विस्तार आणि गरज पडल्यास त्यांचे कान धरण्यासाठी तत्पर न्यायव्यवस्था आहे. आपल्याकडे यातलं काहीच नाही. तरीही वेगाने खासगीकरण; काही क्षेत्रात तर मक्तेदारीकरण सुरू आहे. अगदी सुरुवातीलाच असे अनेक धक्के बसले आणि धोके स्पष्ट दिसत असले, तरी देशात कोणीच जागं व्हायला तयार नाही, असं दुर्दैवाने दिसतं आहे.

विविध क्षेत्रांतील खासगीकरणाचा टक्का वाढवताना त्या प्रमाणात नियंत्रक यंत्रणांना सक्षम आणि प्रभावी करणं आवश्यक आहे. आधी 'इंडिगो' आणि त्यानंतर मुंबई - पुण्यादरम्यानची वाहतूक कोंडी, नवी मुंबईतील नव्या आंतरराष्ट्रीय विमानतळावर होत असलेली मोबाईल नेटवर्कची अडचण, खासगी बसचे देशभर सुरू असलेले भयानक अपघात... या मालिकेत भर टाकण्यासाठी आणखी कितीतरी दुर्घटना आहेत. पण, यातल्या कुठल्या घटनेने संबंधित क्षेत्राची नियंत्रण यंत्रणा बळकट केली गेली? असा प्रश्न विचारला, तर त्याचं उत्तर देण्यासाठी मुद्दलात काहीही नाही! कफ सिरप प्रकरणातील एका बालकाचा २२८ दिवस झुंजल्यानंतर परवाच मृत्यू झाला. इतके बळी जाऊनही या प्रकरणात ज्या यंत्रणांनी डोळेझाक केली, त्यातल्या किती यंत्रणांवर कारवाई झाली? या यंत्रणांच्या नेहमीच्या निष्काळजीपणाला लोक आता सरावले आहेत. त्याबद्दल त्यांची तक्रार नाही. पण, जेव्हा अशा भयंकर दुर्घटना घडतात, तेव्हा त्याचं निमित्त करून तरी या यंत्रणांना; गलेलठ्ठ पगार आणि इतर कमाई करणाऱ्या त्यांच्या अधिकाऱ्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करा, एवढीच जनतेची माफक अपेक्षा आहे. मुंबई - पुणे वाहतूक कोंडीसाठी जबाबदार कोण? हेच अजून स्पष्ट होत नाही, यासारखं दुर्दैव नाही.

पायाभूत सेवांचा वेगाने विस्तार होतो आहे, ही चांगलीच गोष्ट आहे. नवनवे प्रकल्प आखले जात आहेत, त्यांची भूमिपूजनं होत आहेत, त्यासाठी निधीच्या भरीव तरतुदी जाहीर होत आहेत, परदेशी गुंतवणुकीचा वाटाही वाढतो आहे, या सगळ्या कामगिरीबाबत समाधान म्हणूनच राज्यातल्या महायुती सरकारवर महाराष्ट्रातला मतदार पुनःपुन्हा विश्वास व्यक्त करतो आहे, महायुतीला निर्विवाद कौल देतो आहे. विकास प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या या वेगामुळेच बहुसंख्य जनता केंद्रातल्या आणि राज्यातल्या सरकारची समर्थक झाली आहे. धोरणकर्ते देशाला नवनवीन स्वप्नं दाखवून त्याच्या अंमलबजावणीचे साक्षात्कार घडवत असताना या प्रकल्पांच्या दुरुस्ती, देखभालीची जबाबदारी असणाऱ्या यंत्रणा जर गहाळ राहणार असतील, तर त्याचं खापर विनाकारण राजकीय नेतृत्वावरच फुटण्याची शक्यता आहे. त्यामुळे, राज्यातल्या सरकारने असे प्रसंग विशेष गांभीर्याने घेऊन असल्या निष्काळजी, गाफीलपणाची जबाबदारी शक्य तितक्या लवकर निश्चित करून संबंधितांवर कारवाई केली पाहिजे आणि ते लोकांच्या निदर्शनासही आलं पाहिजे. मुंबई - पुणे महामार्ग हा देशातील बहुचर्चित द्रुतगती महामार्ग आहे.

हा महामार्ग मुंबई आणि पुणे या देशातल्या दोन महत्त्वाच्या शहरांना जोडतोच; पण मुंबईचा दक्षिण भारताशी भूपृष्ठावरून संपर्क याच रस्त्याने होतो. रोज सरासरी ५० हजार वाहनं या महामार्गावरून प्रवास करतात. या ५० हजारांत छोट्या चारचाकी गाड्यांपासून मल्टी ॲक्सेल महाकाय मालट्रकचाही समावेश असतो. २५ वर्षांपेक्षा अधिक काळ या महामार्गाची टोल वसुली एकाच कंपनीकडे आहे. ही कंपनी आता देशभर या स्वरूपाची आणखीही काम करते आहे. इतका अनुभव गाठीशी असल्यानंतर या महामार्गावरून कोणकोणत्या प्रकारची वाहतूक होते, त्यात काय जोखीम आहे, आपत्ती व्यवस्थापनाचे कोणते प्रश्न त्यातून निर्माण होऊ शकतात, याची माहिती या कंपनीकडे असायलाच हवी. हा महामार्ग ज्या सरकारी उपक्रमाच्या मालकीचा आहे, ते राज्य रस्ते विकास महामंडळ याबाबत अधिक जागरूक असायला हवं. दुर्घटना घडून २४ तास उलटून गेल्यानंतर आपल्या हालचालींची माहिती चार-पाचच काय, देशातल्या सगळ्या भाषांत दिली, तरी या महामंडळाची कार्यक्षमता त्याने पटवून देता येणार नाही!

प्रोपेनसारखा १७ टन ज्वालाग्रही वायू कोचीहून गुजरातला घेऊन जाणाऱ्या या टँकरला मार्गात आणखी शंभर प्रकारच्या अडचणी येऊ शकल्या असत्या. सामान्यांच्या जीवाला त्यातून असंख्य धोके उद्भवू शकले असते. अशा टँकरला रस्त्यावरून प्रवास करताना खबरदारी घेण्याची काही अट आहे की नाही? या संदर्भातल्या मार्गदर्शक सूचना केवळ कागदांवर, फायलीत गुंडाळून ठेवण्यासाठीच आहेत का? रस्त्यात आडव्या झालेल्या या टँकरमुळे २०-२२ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या. अनेकांच्या आयुष्याची खोटी झाली. मालाचं प्रचंड नुकसान झालं. महानगरांची जीवनावश्यक पुरवठ्याची साखळी तुटली. ध्यानीमनी नसताना रस्त्यात अडकलेल्यांची अक्षरशः दैना झाली. याची नुकसानभरपाई कोणी कोणाला द्यायची? ज्यांनी अपघाताची कल्पना देऊन वेळीच वाहतूक रोखली नाही, त्यांच्या बेजबाबदारपणाची शिक्षा काय ठरवायची? निदान मुंबई, पुण्यातल्या जनतेला तरी आज हेच प्रश्न छळत आहेत. त्यांची उत्तरं जितक्या लवकर मिळतील, तेवढं बरं.



# छत्रपती शिवाजी महाराज यांची 396 वी जयंती शक्तीकुंज वसाहती मध्ये उत्साहात साजरी

छत्रपती शिवाजी महाराज यांचे बुद्धी चातुर्य व कामाप्रतीनिष्ठा ही आपण सर्वांनी अंगीकृत करावी - सुनीलजी इंगळे मुख्य अभियंता औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ

दिनांक 19/02/2026 रोजी औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ येथील अधिकारी-कर्मचारी यांनी सुनीलजी इंगळे साहेब,मुख्य अभियंता औ.वि. केंद्र परळी वैजनाथ यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान, सह्याद्री प्रतिष्ठान आयोजित शिवकालीन प्रात्यक्षिके, हॉलीबॉल स्पर्धा, बालव्याख्याती आनंदी जाधव यांचे व्याख्यान असे विविध सामाजिक उपक्रम राबवून महाराष्ट्राचे प्रेरणास्थान छत्रपती शिवाजी महाराज यांची 396 वी जयंती उत्साहात साजरी केली.

सर्वप्रथम सकाळी आदरणीय सन्माननीय सुनीलजी इंगळे साहेब यांच्या हस्ते ध्वजारोहण करून कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर संध्याकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून सौ. इंगळे मॅडम, सौ. महाजन मॅडम, अधीक्षक अभियंता डी.डी. कोकाटे साहेब, आर.पी रेड्डी साहेब, वरिष्ठ सुरक्षा व्यवस्थापक बी आर अंबाड साहेब, शरद राठोड साहेब कल्याण अधिकारी, संदीप काळे मराठा सेवा संघ शहराध्यक्ष प्रमुख उपस्थित होते.

यावेळी बाल व्याख्याती आनंदी जाधव यांनी जिजाऊ मासाहेबांच्या शिकवणीतून स्वराज्य कसे उभा केली व शिक्षणाबाबत जागृती याबाबत सखोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती कोषाध्यक्ष कृष्णा नागटिळक यांनी समितीतर्फे आयोजित विविध उपक्रमांची सविस्तर माहिती देऊन छत्रपती शिवाजी महाराज यांची निष्ठा व समर्पण तत्व अंगीकारण्याबाबत आवाहन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सत्यशीला ताई पवार- गंगणे यांनी केले. यावेळी आपल्या सुरेख आवाजामध्ये सौ. सोनल ताई खरसडे व डॉ.सत्यशीला ताई पवार-गंगणे यांनी जिजाऊ वंदना सादर केली. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष भीमराव शिरसाट साहेब यांनी आपल्या अध्यक्षीय समारोप मध्ये संघटन व एकीचे महत्त्व सांगून आपले आदर्श सर्व महापुरुषांचे जयंती कार्यक्रम घेऊन सर्वांनी एकत्र यावे असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती स्वागताध्यक्ष अंकुश जाधव यांनी केले.

या जयंती कार्यक्रमाचे आयोजन सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती अध्यक्ष भिमराव शिरसाट, कार्याध्यक्ष अक्षय वीर, उपाध्यक्ष विजय जाधव, निलेश चोथवे, सचिव तुषार पवार, सहसचिव विजय मोरे, प्रदीप नेवगे, कोषाध्यक्ष कृष्णा नागटिळक, रंजीत आचार्य, संघटक प्रवीण भांडे, मुख्य संघटक सूर्यकांत साखरे, सुनील पवार, अभिमन्यू भिसे, संदीप पाटील, रत्नेश्वर अनंतपुरे, पुरुषोत्तम यादव, राजेश करपे, बाळासाहेब शिंदे, अतुल गिराम, आत्माराम काळे, सचिन गिराम, प्रकाश चव्हाण, तुकाराम पाटील, बालासाहेब सोळंके, चंद्रशेखर देशमुख, राजेश पवार, प्रदीप लेंडवे, अविनाश खरसडे, विष्णू सोळंके, अतुल सोळंके आदी पदाधिकारी व परळी शक्तीकुंज वसाहती मधील सर्व अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# गाढे पिंपळगावात छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा; शिवजयंती उत्साहात साजरी



■ परळी वैजनाथ दि.२० (प्रतिनिधी)

तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथे अनेक वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा बसविण्याची ग्रामस्थांची मागणी प्रलंबित होती. विविध निवेदने देऊनही प्रशासनाच्या स्तरावर निर्णय न झाल्याने अखेर गावकऱ्यांनी पुढाकार घेत बुधवारी (दि.१८) रात्री उशिरा अश्वारूढ पुतळ्याची स्थापना केली.

गुरुवारी (दि.१९) शिवजयंतीनिमित्त सकाळपासूनच गावात उत्साहाचे वातावरण होते. पुतळ्याचे विधिवत पूजन करून अभिषेक करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने पुष्पहार अर्पण करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात व जयघोषात शिवजयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमात शिवचरित्रावर भाषणे झाली. वक्त्यांनी शिवरायांचे स्वराज्य स्थापनेतील योगदान, शौर्य, दूरदृष्टी आणि लोकाभिमुख प्रशासन यांचा गौरव केला. युवकांनी घोषवाक्ये देत परिसर दणाणून सोडला.गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक मंडळाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अश्वारूढ पुतळ्याच्या स्थापनेमुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून भविष्यात या ठिकाणी सुशोभीकरण करण्याचा मानसही व्यक्त करण्यात आला.

# मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले उत्पन्न मर्यादा वाढवण्याची मागणी

■ परळी प्रतिनिधी :

महाराष्ट्रात लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणाली (टीपीडीएस) आणि राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा (एनएफएसए) अंतर्गत रेशन पात्रतेसाठी वार्षिक उत्पन्न मर्यादेत त्वरित वाढ करण्याची मागणी मूव्हमेंट फॉर पीस अँड जस्टिस फॉर वेल्फेअर (एमपीजे) ने केली आहे. या संदर्भात संघटनेने मुख्यमंत्र्यांना एक सविस्तर निवेदन सादर केले आहे.

एमपीजेने चिंता व्यक्त केली की रेशन पात्रतेसाठी सध्याची वार्षिक उत्पन्न मर्यादा शहरांमध्ये ₹९,००० आणि खेड्यांमध्ये ₹४,००० आहे. हे मानक १० वर्षांहून अधिक जुने आहे. आजच्या कंबरडे मोडणाऱ्या महागाईमध्ये, दरमहा ₹,००० पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना "आर्थिकदृष्ट्या संपन्न" मानून रेशनपासून वंचित ठेवणे पूर्णपणे अमानवीय आणि वास्तविकतेशी विसंगत आहे. अलिकडेच झालेल्या सरकारी पडताळणी मोहिमेमुळे राज्यातील सुमारे ७५ लाख लोकांना रेशन कव्हरमधून वगळण्यात आले आहे. माध्यमांशी बोलताना एमपीजेच्या प्रवक्त्याने सांगितले की, इतक्या कमी उत्पन्न मर्यादेमुळे, खरोखरच गरजू कुटुंबांनाही यादीतून वगळण्यात आले आहे. महाराष्ट्रात आधीच कुपोषणाची गंभीर समस्या आहे आणि गरिबांना अन्नधान्याच्या अधिकारापासून वंचित ठेवणे हे त्यांच्या जगण्याच्या अधिकारावर हल्ला आहे.

सध्याच्या उत्पन्न मर्यादेनुसार, गरीब कुटुंबाला घरभाडे देणेही अशक्य आहे, अन्न आणि शिक्षण तर दूरच. महाराष्ट्र सरकारने वार्षिक उत्पन्न मर्यादा ₹५०,००० पर्यंत वाढवावी किंवा ती महाराष्ट्र सरकारच्या अकुशल कामगारांसाठीच्या किमान वेतनाशी जुळवावी अशी मागणी एमपीजेने केली आहे.

एमपीजेने सरकारला या असंवेदनशील धोरणात सुधारणा करून गरिबांना न्याय देण्याचे आवाहन केले आहे.





# ज्येष्ठ पत्रकार लक्ष्मण वाकडे यांच्या 'धडपड' लेखसंग्रहाचे प्रकाशन; नव्या पिढीसाठी मार्गदर्शक ग्रंथ : प्रशांत जोशी

■ परळी वैजनाथ :

परळीतील ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक लक्ष्मण वाकडे यांच्या 'धडपड' या लेखसंग्रहाचे प्रकाशन शनिवारी (ता.२१) नेहरू चौक परिसरातील हनुमान कॉम्प्लेक्स येथे माजीमंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांचे स्वीय सहाय्यक प्रशांत जोशी यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

यावेळी बोलताना प्रशांत जोशी म्हणाले की, 'धडपड' हा लेखसंग्रह पत्रकारिता क्षेत्रातील नव्या पिढीसाठी अत्यंत उपयुक्त असून तो मार्गदर्शक ग्रंथ ठरणारा आहे. गेली चार दशके परळीच्या पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असलेल्या लक्ष्मण वाकडे यांनी आपल्या लेखनातून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडत सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. त्यांनी नेहमीच वेगळे विषय आणि प्रभावी मांडणी करून पत्रकारितेत आदर्श उभा केला असून अनेक पत्रकार घडवले आहेत, असेही त्यांनी नमूद केले.



यावेळी ज्येष्ठ पत्रकार संजय खाकरे, जगदीश शिंदे, न्यू हायस्कूलचे पर्यवेक्षक दाजीबा नखाते, ज्येष्ठ शिक्षक बाबासाहेब मुंडे, सुर्यकांत कातकडे, अमोल कांबळे, राहुल ताटे, सचिन काळम, पत्रकार दत्ता शिवगण, मोहन साखरे, माऊली होळंबे, रामदास कराड आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविक राहुल ताटे यांनी केले. संजय खाकरे, बाबासाहेब मुंडे आणि सुर्यकांत कातकडे यांनी आपल्या मनोगतातून वाकडे यांची पत्रकारिता व ग्रंथसंपदा नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. लक्ष्मण वाकडे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, परळीत बातमीदार म्हणून विविध वृत्तपत्रात काम करत असताना मनात फुललेले आणि विविध वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेले निवडक लेख 'धडपड' या संग्रहात समाविष्ट करण्यात आले आहेत. हा पहिला भाग असून लवकरच आणखी दोन भाग प्रकाशित करण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले. परळी येथील सुधांशू प्रकाशन संस्थेतर्फे या लेखसंग्रहाचे प्रकाशन करण्यात आले असून पुस्तकाची मांडणी करणारे दत्ता शिवगण यांचा यावेळी प्रशांत जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन अमोल कांबळे यांनी केले. दरम्यान, 'धडपड' हे लक्ष्मण वाकडे यांचे पंचविसावे पुस्तक असून त्यांच्या बालकुमार कथासंग्रहासह श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग परळीवरील अनेक ग्रंथ वाचकप्रिय ठरले आहेत. 'वैद्यनाथाची परळी' या ग्रंथाच्या सहा आवृत्त्या तर 'श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंग स्थळ कथा महात्म्य' या ग्रंथाच्या तीन आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)





# "डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील मजबूत दुवा म्हणजे परिचारिका ": डॉ. दिपाली उमाळे

## एसएनडीटीच्या लीलाबाई ठाकरेसी कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये ७४वा कॅन्डल लाइटिंग व पदवीदान सोहळा उत्साहात संपन्न

**मुंबई | प्रतिनिधी**

"वैद्यकीय क्षेत्रात डॉक्टर आणि रुग्ण यांच्यातील सर्वात मजबूत भिंत किंवा आधारस्तंभ म्हणजे परिचारिका होय. तिचे समर्पण आणि सेवाभाव हाच आरोग्यव्यवस्थेचा कणा आहे," असे गौरवपूर्ण उद्गार मान्यवरांनी काढले. निमित्त होते, एसएनडीटी महिला विद्यापीठांतर्गत असलेल्या लीलाबाई ठाकरेसी कॉलेज ऑफ नर्सिंगच्या ७४व्या कॅन्डल लाइटिंग आणि पदवीदान समारंभाचे.

बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ रोजी चर्चगेट येथील सर सीताराम व लेडी शांताबाई पाटकर दीक्षांत सभागृहात हा दिमाखदार सोहळा पार पडला. १९५२ साली स्थापन झालेले हे महाविद्यालय महाराष्ट्रातील पहिले नर्सिंग महाविद्यालय असून, महिला सक्षमीकरण आणि गुणवत्तापूर्ण नर्सिंग शिक्षणात या संस्थेचा मोठा वाटा आहे. उपमुख्यमंत्र्यांच्या शुभेच्छा आणि मान्यवरांची उपस्थिती

या सोहळ्यासाठी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा. श्री. एकनाथ शिंदे साहेब यांनी विशेष संदेशाद्वारे आयोजक व नर्सिंग विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. उज्वला चक्रदेव यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून पी. डी. हिंदुजा हॉस्पिटलचे क्रिटिकल केअर कन्सल्टंट डॉ. खुशराव बजन उपस्थित होते, तर कुलसचिव डॉ. विलास नंदावडेकर यांची विशेष उपस्थिती लाभली.

■ **नर्सिंग क्षेत्रातील 'पवित्र' प्रवेश**

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीताने झाली. त्यानंतर पारंपारिक दीपप्रज्वलन



आणि 'कॅन्डल लाइटिंग' (नर्सिंग शपथविधी) सोहळा पार पडला. हातात मेणबत्ती घेऊन घेतलेली ही प्रतिज्ञा विद्यार्थिनींच्या सेवाभावी आयुष्याची खऱ्या अर्थाने सुरुवात ठरली. प्राचार्या डॉ. शोभा गायकवाड यांनी महाविद्यालयाचा वार्षिक अहवाल सादर करताना शैक्षणिक प्रगती आणि संशोधनातील योगदानाचा आढावा घेतला.

■ **मान्यवरांचे प्रेरणादायी विचार**

■ **डॉ. उज्वला चक्रदेव: परिचारिकांच्या वाट्याला येणारे कष्ट आणि त्यांची सहनशीलता ही समाजासाठी अमूल्य आहे. त्यांनी परिचारिकांच्या समर्पणाचे कौतुक केले.**

■ **डॉ. विलास नंदावडेकर: परिचारिकांनी आता केवळ क्लिनिकल सेवेपुरते मर्यादित न राहता शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातही आपली मोहोर उमटवावी, असा नवा दृष्टिकोन त्यांनी मांडला.**

■ **डॉ. खुशराव बजन: आरोग्यसेवेत व्यावसायिक जबाबदारीसोबतच करुणा आणि नैतिक मूल्यांची जपणूक करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.**

या सोहळ्यामुळे नर्सिंग क्षेत्रात पाऊल ठेवणाऱ्या नवोदित नर्सिंग विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. कुशल, संवेदनशील आणि सामाजिकदृष्ट्या जबाबदार परिचारिका घडविण्याच्या ध्येयाची प्रचिती या कार्यक्रमातून आली अशी माहिती अनिल जायभाये बीडकर यांनी दिली.

# आष्टीत पोलिसांची धडक कारवाई : तीन पिस्टलसह आरोपी जेरबंद, एक फरार



**आष्टी :** शिवजयंती उत्सवानिमित्त कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सुरू असलेल्या पेट्रोलिंगदरम्यान आष्टी पोलिसांनी मोठी कारवाई करत तीन देशी बनावटीच्या पिस्टलसह दोन आरोपींना ताब्यात घेतले, तर एक आरोपी फरार झाला आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे ब्रह्मगाव परिसरात संशयास्पद वाहनाची तपासणी केली असता वाहनातून तीन देशी बनावटीच्या पिस्टल व जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली. जप्त शस्त्रांची किंमत सुमारे 1 लाख 50 हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

या प्रकरणात मोहम्मद इस्माईल सय्यद व भरत उर्फ आमीर बाबासाहेब मोमीन (रा. पाटोदा) यांना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध शस्त्र कायदा 1959 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एक आरोपी फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

पोलीस निरीक्षक शरद भुनेकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

# सिम्बायोसिस कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये 'मानसिक आरोग्य उपचार' कार्यशाळेचे यशस्वी आयोजन - डॉ. शिला उपेंद्र

**प्रतिनिधी | पुणे**

केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष रुग्णसेवेतील कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने, सिम्बायोसिस कॉलेज ऑफ नर्सिंग (SCON) मधील 'मानसिक आरोग्य नर्सिंग विभाग' आणि एम.एस्सी. नर्सिंगच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी " Bridging Theory Into Practice: A Workshop On Mental Health Therapies For Nursing Competency"या विशेष कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केले.

सदर कार्यशाळा सिम्बायोसिस कॉलेज ऑफ नर्सिंगचे संचालक डॉ. सोनोपंत जी. जोशी सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पाठिंब्याने पार पडली. मानसिक आरोग्य विभागाच्या प्रमुख आणि उपसंचालिका डॉ. शीला उपेंद्र मॅडम यांच्या दूरदृष्टीने आणि नेतृत्वाखाली या उपक्रमाची आखणी करण्यात आली होती.

■ **शिक्षणातून सक्षमतेकडे: प्रत्यक्ष अनुभवावर भर**

मानसिक आरोग्य नर्सिंगसाठी केवळ सैद्धांतिक ज्ञान



पुरेसे नसून, रुग्णाला सर्वांगीण आणि केंद्रस्थानी ठेवून सेवा देण्यासाठी विकसित उपचार कौशल्यांची आवश्यकता असते. वर्गातील शिक्षण आणि रुग्णालयातील प्रत्यक्ष सराव यांमधील अंतर कमी करणे हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता. आधुनिक मानसिक आरोग्य सेवेमध्ये वापरल्या जाणाऱ्या विविध 'पुराव्यावर आधारित' आणि 'बिगर-औषधोपचार' पद्धतींचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना यावेळी देण्यात आला.

■ **विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग**

B.Sc. आणि M.Sc. नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सक्रिय सहभाग नोंदवला. विविध परस्परसंवादी सत्रांमुळे विद्यार्थ्यांची नैदानिक क्षमता (Clinical Competence), उपचारात्मक संवाद आणि चिकित्सक विचार कौशल्ये अधिक बळकट होण्यास मदत झाली.

■ **डॉ. शीला उपेंद्र यांचे प्रतिपादन:**

"मानसिक आरोग्य नर्सिंग हे केवळ औषध व्यवस्थापनापुरते मर्यादित नाही. त्यासाठी सहानुभूती, उपचारात्मक उपस्थिती आणि व्यावहारिक कौशल्य विकास आवश्यक आहे. अशा कार्यशाळा विद्यार्थ्यांना त्यांच्या सैद्धांतिक ज्ञानाचे रूपांतर दयाळू आणि सक्षम रुग्णसेवेमध्ये करण्यास सक्षम करतात."

सर्व नर्सिंग विद्यार्थी आणि प्राध्यापकांकडून या उपक्रमाचे विशेष कौतुक होत आहे. मानसिक आरोग्य नर्सिंग शिक्षणामध्ये व्यावहारिक तयारी वाढवण्याच्या दिशेने हे एक अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे

# उद्योजक आयडॉल रमेश दादा आजबे; पठ्याचा नादच करायचा नाय कंपनीच्या टार्गेटचा आकडा ओलांडून दुप्पट ट्रॅक्टर ची केली विक्री

## सावळेश्वर ट्रॅक्टर्सची वर्षभरात यशस्वी वाटचाल दुसऱ्या वर्षात पदार्पण केक कापून आनंदोत्सव साजरा

## ग्राहकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद वर्षात ४४४ ट्रॅक्टर ची विक्रमी विक्री करुन महत्त्वाचा टप्पा गाठला

**प्रतिनिधी | सोपान पगारे**

शून्यातून विश्व निर्माण करून उद्योग जगतामध्ये गगन भरारी घेत शेकडो नागरिकांच्या हाताला काम मिळवून देणारे,स्वकर्तत्वावर आपले वेगळे स्थान निर्माण करणारे उद्योजक आयडॉल असणारे रमेश दादा आजबे पाटील यांच्या सावळेश्वर उद्योग समूहाचे आष्टी शहरातील सावळेश्वर ट्रॅक्टर्स या स्वराज कंपनीच्या भव्य ट्रॅक्टरचा शुभारंभ मागील वर्षी शिवजयंतीच्या शुभ मुहूर्तावर करण्यात आला होता. विशेष आकर्षक ग्राहकांना सवलत व तत्पर सेवा दिल्याने आष्टी तालुक्यात स्वराज ट्रॅक्टर ला मोठी मागणी वाढली अन जिकडे-तिकडे स्वराज ट्रॅक्टरच ग्राहकांनी खरेदी करण्यास पसंती दिल्याने सावळेश्वर ट्रॅक्टरने कंपनीने ठरवून दिलेल्या टार्गेटचा टप्पा ओलांडून दुप्पट ट्रॅक्टरचे विक्रमी विक्री करून गावागावात शोरूमचे व कंपनीचे नाव पोहोचले आहे. ग्राहक राजांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल सावळेश्वर ट्रॅक्टर चे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी ग्राहकांचे आभार मानले पहिल्या वर्धापन दिन मेहनत घेणाऱ्या सर्व स्टाफ कर्मचाऱ्यांसोबत केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

सावळेश्वर उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या जिवनामध्ये परिवर्तन घडवून आणणे आणि त्यांचे जिवन समृद्ध करणे या उद्देशाने प्रेरित होऊन ट्रॅक्टर उद्योग जगतात २०१६ पासून पाऊल ठेवले त्यांनी आष्टी शहरात मागिल वर्षी १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती च्या शुभमुहूर्तावर सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नावाने स्वराज ट्रॅक्टर चे नवीन ट्रॅक्टर शोरुमचा भव्य शुभारंभ संपन्न झाला. अनेक ट्रॅक्टरच्या विविध कंपन्या असून वार्षिक ट्रॅक्टर विक्री करण्यासाठी डीलरला टारगेट दिले जाते.हे टारगेट पूर्ण नाही झाले तर काही कंपन्या डीलर कडून डीलरशिप देखील काढून घेतात असे प्रसंग अनेक वेळा पाहायला मिळतात परंतु याला अपवाद आहे.ते म्हणजे सावळेश्वर ट्रॅक्टर वर्षभर भव्य बंफर ऑफर ठेवल्याने तात्काळ बुकींग करणा-यास सवलत देण्यात आल्याने अवघ्या १ वर्षात ४४४ स्वराज ट्रॅक्टर ची विक्रमी विक्री झाली आहे.दणगट व कमी खर्चात ज्यादा काम करणाऱ्या स्वराज ट्रॅक्टने आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांना भुरळ घातली आहे.हा विक्रमी सेलचा टप्पा ओलांडण्यासाठी संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे यांच्या सह स्टेट हेड गुप्ता साहेब, एरिया मॅनेजर गिरीश

### तुमच्या सहकार्यानेच आम्ही हे यश मिळवू शकलो आहोत.

आमच्या शोरुमच्या वर्धापनदिनानिमित्त सर्व प्रिय ग्राहक आणि हितचिंतकांचे मनापासून आभार! तुमचा अमूल्य विश्वास आणि पाठिंबा हाच आमच्या यशाचा आधार आहे. गेल्या वर्षांपासून तुमच्या सेवेसाठी तत्पर राहून, तुमच्या सहकार्यानेच आम्ही हे यश मिळवू शकलो आहोत. भविष्यातही उच्च दर्जाची तत्पर सेवा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. **- रमेश दादा आजबे** (सावळेश्वर ट्रॅक्टर्स धोंडे पेट्रोल पंपा समोर नगर रोड आष्टी )



जाधव, टेरेटरी मॅनेजर चेतन मुंडे साहेब,ब्रांच मॅनेजर मुळे साहेब,मॅनेजर प्रकाश कदम, मॅनेजर राजू साबळे,अकाउंट प्रांजली उगले,सुजाता सायकड,आशा पवार, रिसेप्शन रेणुका वैद्य, जयश्री सांगळे, लखन आजबे,आकाश शेळके,जालिंदर भवर, सागर निकरड,श्रीकांत गोले, ऋषी गायकवाड,रणजीत मुंडे, नामदेव आजबे,रवींद्र खंडागळे,ओमकार सोले, अशोक खंडागळे,धीरज रोडे,सुरज गोलेकर,स्वप्निल बरकडे,नामदेव हराळ,इब्राहिम पठाण, हनुमान घरगीणे, विश्वकर्मा कुमार,पुजा साठे,आदींच्या अथक परिश्रमाने ग्राहकांना जलद सेवा दिल्याने ट्रॅक्टरचा विक्रमी विक्रीचा टप्पा पार केला आहे.




महापशुधन एक्स्पो दिनांक १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान डॉ. अर्चना नागरगोजे तालुका कृषि अधिकारी परळी वैद्यनाथ जि बीड , पत्रकार दुर्गादास लांब,शिल्पा बनाळे विस्तार अधिकारी, प्रज्ञा भोळे ग्राम विकास अधिकारी यांची सेंद्रिय उत्पादित चिया सीड्स महेश नागरगोजे रा. बनकारंजा ता. केज जि. बीड यांचे स्टॉलला भेट देऊन उपस्थित शेतकरी यांचेसोबतही चर्चा करण्यात आली.

# अविरत बारा वर्षांपासून समीर शेख यांच्याकडून शिवज्योत प्रज्वलित

## शिवनेरी ते सांगवी पाटण 200 किमी पायी शिवज्योत – हिंदू-मुस्लिम एकोप्याचा प्रेरणादायी संदेश

■ देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील उच्चशिक्षित युवक समीर शेख गेल्या बारा वर्षांपासून शिवनेरी किल्ला येथून सांगवी पाटणपर्यंत पायी शिवज्योत आणत असून, या उपक्रमातून समाजात एकता, बंधुता व सर्वधर्मसमभावाचा संदेश देत आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रेरणादायी वारसा

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी राजे नव्हते, तर आदर्श राज्यकर्ते, कुशल सेनानी व दूरदृष्टी असलेले समाजसुधारक होते. त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य हे फक्त राजकीय स्वातंत्र्य नव्हे, तर सामाजिक समतेचे प्रतीक होते. जाती-धर्माचा भेद न करता योग्यतेनुसार सर्वांना संधी देणारी प्रशासन व्यवस्था त्यांनी उभी केली. 'प्रजेचे राज्य प्रजेसाठी' हा विचार प्रत्यक्षात आणत त्यांनी हिंदवी स्वराज्याची पायाभरणी केली.

**२०० किलोमीटरचा अविरत पायप्रवास**

यंदाही समीर शेख यांनी ओंकार खिलारे, दादा इरले व गावातील मावळ्यांसमवेत सुमारे २०० किलोमीटरचा पायी प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला. एम.एस्सी.,



बी.एड., एम.एड. असे उच्च शिक्षण घेतलेले समीर शेख उच्च विचारसरणीचे व समाजासाठी समर्पित युवक म्हणून ओळखले जातात.

शिवनेरीवरून प्रस्थान करताना जुन्नर नगरपंचायतीच्या वतीने त्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. धामणगाव येथे शिवज्योत पोहोचल्यावर संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी स्वागत करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले. हिंदू-मुस्लिम एकोप्याचे जिवंत उदाहरण यावेळी समीर शेख म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारताना कधीही जाती-धर्माचा भेद केला नाही. अठरा पगड जातींना सोबत घेऊन त्यांनी स्वराज्य निर्माण केले. मी अभिमानाने सांगतो – मी छत्रपतींचा मुस्लिम मावळा आहे." गेल्या आठ वर्षांपासून समीर शेख हे भैरवनाथ जन्माष्टमी सोहळ्यानिमित्त वाराणसी (काशी) येथून गंगाजल आणत आहेत, तर बारा वर्षांपासून शिवनेरी ते सांगवी पाटण शिवज्योत आणण्याची परंपरा ते अविरतपणे जपत आहेत.

**समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम**

या उपक्रमात विविध जाती-धर्मातील युवक मोठ्या संख्येने सहभागी होत असून, समाजात एकात्मता, सलोखा व शिवरायांच्या विचारांचा प्रचार-प्रसार होत आहे. हा उपक्रम म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा जिवंत वारसा असल्याची भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# परळी रेल्वे सुरक्षा बलाचा 15 दिवसीय अग्नि सुरक्षा विशेष अभियान सुरू; प्रवासी सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य

■ परळी : प्रतिनिधी

प्रवासी सुरक्षेच्या दृष्टीने रेल्वे सुरक्षा बल (RPF) परळी यांनी १५ दिवसीय अग्नि सुरक्षा विशेष अभियानाची जोरदार सुरुवात केली असून संपूर्ण स्थानक व प्रवासी गाड्यांमध्ये काटेकोर तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे.

या विशेष अभियानांतर्गत परळी रेल्वे स्थानकावर येणाऱ्या सर्व प्रवासी गाड्यांची सखोल तपासणी करण्यात येत असून अग्निसुरक्षेशी संबंधित प्रत्येक महत्त्वाच्या बाबीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. पार्सल व बुकिंग विभागात मालाची चुकीची घोषणा होऊ नये, वाहतुकीसाठी स्वीकारलेल्या दुचाकींमध्ये इंधन शिल्लक नसावे तसेच माल वाहतुकीसाठी निर्धारित पॅकेजिंग नियमांचे पालन केले जात आहे की नाही, याची तपासणी केली जात आहे.

तसेच प्रवासी गाड्यांमध्ये ज्वलनशील व स्फोटक पदार्थ, गॅस सिलिंडर, स्टोव्ह किंवा स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या धोकादायक वस्तूंवर कडक बंदी असल्याबाबत विशेष दक्षता घेतली जात आहे. गाड्यांमध्ये धूम्रपानास सक्त मनाई असून सिगारेट, बीडी, माचीस व लायटर वापरावरही नियंत्रण ठेवले जात आहे. यासोबतच डब्यांमध्ये सैल किंवा लटकलेले विद्युत तारा नसावेत, याचीही तपासणी करून संभाव्य अग्निधोक्यांना आळा घालण्याचा प्रयत्न केला जात आहे. रेल्वे सुरक्षा बलाने प्रवाशांना सहकार्य करण्याचे आवाहन करत "सुरक्षा हीच सर्वोच्च सेवा" असा संदेश दिला आहे.

ही मोहीम निरीक्षक एस.बी. कांबळे (RPF/परळी), एम. किशोर (SIPF/परळी), ASIPF विजय लांडगे तसेच RPF पथकातील जवानांच्या उपस्थितीत प्रभावीपणे राबविण्यात येत असून प्रवाशांनी नियमांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन रेल्वे सुरक्षा बलाकडून करण्यात आले आहे.





# पर्यावरण, जैविक संवर्धनासाठी भारतभ्रमण अवलिया युवकांचे परळीत स्वागत

## परळीच्या अक्षय मुंडे चा सहभाग

■ परळी / प्रतिनिधी

विकासाच्या नावाखाली होत असलेला पर्यावरणाचा ऱ्हास पर्यायी जैविक विविधतेचे नुकसान याची जनजागृती करत पर्यावरण संवर्धन आणि जैव विविधता टिकविण्यासाठी देशभरात असलेल्या व्याघ्र प्रकल्पला भेट देणाऱ्या युवकांचा परळी येथील नागनाथ निवासी विद्यालयाच्यावतीने सत्कार व सन्मान करण्यात आला.

विकासाच्या नावाखाली आजमितीस मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाचा ऱ्हास होत चालला आहे.जल, जंगल, जमीन, नदी यांचे अस्तित्व नष्ट होत असल्याने पर्यायी यावर अवलंबून असलेली जैव विविधता नष्ट होत चालली आहे. पर्यावरणातील अन्न साखळी बिघडत जात असल्याने सजीवसृष्टीवर विपरीत परिणाम होत असल्याने परळी येथील आयोध्या नगर मधील रहिवासी असलेला युवक अक्षय मुंडे व त्याचा मित्र नागपूर येथील आशिष नागपूरकर यांनी पर्यावरण संवर्धन आणि जैव विविधता जतन आणि संवर्धन उपक्रम हाती देशभरात असलेल्या 58 व्याघ्र प्रकल्पाला सफारी करत याबाबत जनजागृती करत आहेत. या अवलिया युवकांच्या या कामी रिलायन्स फौंडेशनकडून देखील दक्षिण आफ्रिका या देशाचा अभ्यास दौरा करण्याची संधी प्राप्त मिळाली असून अक्षय मुंडे हा परळी येथील नागनाथ निवासी विद्यालयाचे सहशिक्षक ज्ञानोबा मुंडे यांचा मुलगा असून त्याच्या या सफारी दरम्यान परळी येथे आले असता विद्यालयाच्या वतीने अक्षय याची आई मिराबाई मुंडे, व सहकारी मित्र यांचा विद्यालयाच्या वतीने हृदपूर्वक सत्कार व सन्मान करून पुढील प्रवास करण्याकरिता प्रेरणा देण्यात आली.




# दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलमध्ये विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

## शाळेतील बालवैज्ञानिकांनी विज्ञान प्रदर्शनाच्या माध्यमातून विविध प्रयोगांचे सादरीकरण केले

■ परळी / (प्रतिनिधी)

दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूल येथे दिनांक २० फेब्रुवारी रोजी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला नवी दिशा देण्यासाठी भव्य दिव्य विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन समारंभ आयोजित करण्यात आला. याप्रसंगी मुख्य अतिथी व परीक्षक म्हणून प्राध्यापक अशोक पवार सर, (लक्ष्मीबाई देशमुख,महिला कॉलेज,परळी ), प्रा. श्री. अरुण चव्हाण सर व शाळेचे प्राचार्य मा.श्री श्रीकांत पाटील सर इतर मान्यवर उपस्थित होते. उद्घाटनानंतर विज्ञान प्रदर्शन सर्वांसाठी खुले करण्यात आले. शाळेच्या सभागृहात विविध विभागांमध्ये मांडलेले प्रकल्प पाहण्यासाठी दिवसभर विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

इयत्ता पहिली ते नववीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी विज्ञानातील विविध संकल्पना प्रत्यक्ष मॉडेल्सच्या माध्यमातून सादर केल्या. पर्यावरणपूरक ऊर्जा निर्मिती, पावसाच्या पाण्याचे संकलन, स्वयंचलित सिंचन व्यवस्था, स्मार्ट शहराची रचना, सौरऊर्जेवर चालणारी उपकरणे आणि साध्या साहित्यापासून




तयार केलेले रोबोटिक्स मॉडेल्स विशेष आकर्षण ठरले. काही विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनातील समस्यांवर उपाय सुचवणारे उपयुक्त प्रयोगही सादर केले. प्रदर्शनादरम्यान विद्यार्थ्यांनी आपल्या प्रकल्पांमागील वैज्ञानिक तत्त्वे उपस्थितांना सोप्या भाषेत समजावून सांगितली. उपस्थित मान्यवरांनी व अनेक पालकांनी विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचे आणि सादरीकरण कौशल्याचे कौतुक केले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि प्रयोगशीलता वाढीस लागते, असे मत शाळेचे प्राचार्य मा. श्रीकांत पाटील सर यांनी आपल्या प्रास्ताविकातून व्यक्त केले. विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषा किरण गित्ते मॅडम ,शाळेचे मार्गदर्शक व प्रेरणास्त्रोत मा.श्री.किरण गित्ते साहेब IAS (सचिव,त्रिपुरा सरकार) यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तका पुरते शिक्षण मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी देणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश होता. तसेच त्यांनी शाळेतील बाल वैज्ञानिकांच्या प्रयोगांचे विशेष कौतुकही केले.

हे विज्ञान प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी शालेय व्यवस्थापन समिती,विज्ञान विभागातील व शाळेतील सर्वच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर विद्यमान सरपंच प्रशासक ; राज्य सरकारचा ऐतिहासिक निर्णय, सरपंच परिषदेतआनंदोत्सव प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांच्या पाठपुराव्याला आले यश

■ आष्टी प्रतिनिधी

महाराष्ट्रातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासक म्हणून विद्यमान सरपंचांचीच नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयामुळे राज्यभरातील सरपंचांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, 'सरपंच परिषद, मुंबई महाराष्ट्र'च्या लढ्याला मोठे यश मिळाले आहे. सरपंच परिषद प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी या निर्णयाचे स्वागत करत राज्य शासनाचे आभार मानले आहेत.

राज्यातील तब्बल १४ हजार २३४ ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर प्रशासक नियुक्तीचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या विद्यमान सरपंचांनाच प्रशासक म्हणून संधी द्यावी, अशी ठाम भूमिका सरपंच परिषदेकडून मांडण्यात आली होती. यासाठी राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील पदाधिकाऱ्यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. तसेच न्यायालयीन स्तरावरही लढा देण्यात आला.

दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी राज्य शासनाने काढलेल्या राजपत्रानुसार, ज्या ग्रामपंचायतींची मुदत संपली आहे, त्या ठिकाणी विद्यमान सरपंचांना 'प्रशासक' म्हणून कामकाज



पाहण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. तसेच ग्रामपंचायत सदस्यांना 'प्रशासकीय समिती' म्हणून अधिकार देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे गावपातळीवरील विकासकामांना गती मिळणार असून, प्रशासकीय अडथळे दूर होणार आहेत.

या निर्णयामुळे अनुभवी आणि गावच्या परिस्थितीची पूर्ण माहिती असलेल्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून गावाचा कारभार अधिक प्रभावीपणे चालणार आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांऐवजी लोकनियुक्त प्रतिनिधींनाच जबाबदारी दिल्याने लोकशाही व्यवस्थेचे संरक्षण झाले असून, गावांचा विकास अखंडितपणे सुरू राहणार असल्याचा विश्वास सरपंच परिषदेकडून व्यक्त करण्यात आला आहे.

या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे तसेच सरपंचांच्या मागणीला पाठिंबा देणारे आ. श्रीकांत भारतीय,आ.सुरेश धस यांच्यासह राज्यातील ४० आमदारांचे सरपंच परिषदेच्या वतीने आभार मानण्यात आले आहेत. सरपंचांच्या न्याय्य मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत राज्य सरकारने लोकशाहीचा सन्मान राखला असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. या ऐतिहासिक निर्णयाच्या स्वागतासाठी राज्यातील विविध भागांत सरपंच व पदाधिकाऱ्यांकडून आनंदोत्सव साजरा करण्यात येत असून, मिठाई वाटप व अभिनंदन सोहळ्यांद्वारे सरकारचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील ग्रामपंचायत व्यवस्थेला स्थैर्य मिळणार असून, ग्रामीण विकासाच्या कामांना नवे बळ मिळणार असल्याचे मत ग्रामपंचायत पदाधिकारी व सरपंच परिषदेकडून व्यक्त करण्यात येत आहे.